# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. :०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


**दि. १५.०१.२०२५**

## उमेदवारांकरीता सूचना

**विषय : पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या निवडसूचीत नमूद उमेदवारांचे दस्तऐवज पडताळणीबाबत.**

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती-२०२३ अंतर्गत दि.०८.१२.२०२३ ते ११.१२.२०२३ या कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन निवडसूची पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून उमेदवारांच्या नावाची शिफारस दस्तऐवज पडताळणी, वैद्यकीय तपासणी व पूर्वचारित्र्य पडताळणीचे अधीन करण्यात आली आहे.

सोबतच्या तक्त्यातील निवड यादीत व प्रतिक्षा यादीत नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबत पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह स्वत: (प्रतिनिधी चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता मंगळवार दि.२१/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पनवेल महानगरपालिका मुख्यालय, पनवेल येथे समक्ष उपस्थित रहावे.

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्ठर्थ आवश्यक असलेली मुळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मुळ कागदपत्रे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | २ |
| १ | एस.एस.सी प्रमाणपत्र |
| २ | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शेक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे. |
| ३ | वयाचे पुराव्याबाबत जाहिरात शुध्दीपत्रक क्र.१ मध्ये नमूद पुरावा दर्शविणारे प्रमाणपत्र. |
| ४ | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र. |
| ५ | अनूसुचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र. |
| ६ | वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र. |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र. |

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | २ |
| ९ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १० | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| ११ | पदवीधर अंशकालीन आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १२ | भुकंपग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १३ | प्रकल्पग्रस्त आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र. |
| १४ | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी. |
| १५ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला / डोमिसाईल प्रमाणपत्र. |
| १६ | ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे अशा पदाकरीता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास -<br>१. नियोक्त्याने दिलेला नियुक्ती आदेश<br>२. नियोक्त्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन चिठ्ठी (पेमेंट स्लिप) ज्यात उमेदवाराचा आयडी क्रमांक व बँकेचे नाव नमुद असेल..<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथवा बँक स्टेटमेंट. |

उमेदवार विहीत शैक्षणीक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडजाळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

**दि.२१/०१/२०२५ रोजी दस्ताऐवज पडताळणीकरिता उपस्थित रहावयाच्या उमेदवारांची यादी**

| Sr.No | Application Seq. No. | Candidate Fगull Name | Post Name |
|---|---|---|---|
| 1 | 1089402 | RAVINA RANGRAO YEWALE | सांख्यिकी अधिकारी |
| 2 | 1029732 | DIPALI GULABRAO CHEKE | परिचारिका (ANM) |
| 3 | 1106047 | MINAKSHI YASHAWANT TURE | परिचारिका (ANM) |

(कैलास गावडे)
उप आयुक्त (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका.